ePaper

# मुख्यमंत्र्यांच्या चित्रफितीमुळे वाद; जालन्याला जाण्याचे टाळले

| वर्ष - 7 । अंक - 132 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार , दिनांक 14 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- टीम इंडियाने केले लंका दहन!
- श्रीदेवींच्या आठवणीला उजाळा!
- केरळमध्ये निपाहचा धोका वाढला!
- मुख्यमंत्री शिंदेंसह 16 आमदार अपात्र ?


# आगामी निवडणुकीसाठी राजकीय पक्षांच्या ‘जोर बैठका’!

## » नेतृत्वाच्या उपस्थित विचार मंथन ; पक्षनिहाय घेतला जातोय आढावा

**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

**स्थानिक स्वराज्य संस्थांची संपलेली मुदत, लोकसभेची संपणारी मुदत पाहता लवकरच निवडणुका लागतील अशी शक्यता राजकीय जाणकार वर्तवित आहेत. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा देखील कामाला लागल्या आहेत. हे चित्र पाहता सर्वच राजकीय पक्षांनी देखील दंड थोपटले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील भाजपा, राष्ट्रवादी, दोन्ही शिवसेना, मनसे, आरपीआय, वंचित या पक्षातील सर्वच नेत्यांनी बैठकांचा सपाटा सुरु केला आहे. या मध्ये पक्षाचा आढावा, ध्येय धोरणे, राजकीय भूमिका आणि उमेदवारांची चाचपणी केली जात आहे.**











भाजपाच्या वतीने जिल्हा प्रभारी, संघटन प्रमुख, विधानसभा निवडणूक प्रमुख, लोकसभा निवडणूक प्रमुख यांच्या उपस्थितीत बैठका जोरात आहेत. त्यामध्ये पक्षनिहाय आढावा घेतला आहे. उमेदवारांची चाचपणी केली आहे. नवीन शहराध्यक्ष जाहीर केल्यानंतर इतर कार्यकारिणीसाठी इच्छुक असणाऱ्यांसोबत प्रभारींच्या नेतृत्वाखाली भेटीगाठी घेण्यात आल्या आहेत. भाजपा बरोबरच दोन्ही शिवसेनेने देखील तयारी सुरु केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाकडून खा. श्रीरंग बारणे तर माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शांत असणाऱ्या आढळराव पाटील यांनी महापालिका कामकाजात लक्ष घालणार असल्याचे सूतोवाच केले आहे. तर दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांशी स्वतः पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे चर्चा करत आहेत. नुकतीच त्यांनी मावळ आणि शिरूर बाबत पक्षाच्या आढावा बैठकीत माहिती घेतली आहे. कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत.

शिवसेनेप्रमाणेच राष्ट्रवादीही गटात विखुरली असल्याने सुरुवातीला पक्ष संघटनेत फेरबदल करण्याकडे दोन्ही गटाने लक्ष दिले आहे. निवडणुकीपूर्वी पदाधिकारी नेमण्याचा सपाटा सुरु केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाकडून शहराध्यक्ष, महिला आघाडी, युवक अध्यक्ष यांच्या फेरनियुक्त्या तसेच आहे त्यांनाच शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. तर दुसरीकडे खा. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शहरातील पदाधिकारी सातत्याने बैठकांतून राजकीय खलबते करत आहेत.

### मनसे, आरपीआय सक्रीय...

मोठ्या पक्षांसोबत शहरात लहान ताकद असणारे इतर पक्ष देखील मैदानात उतरले आहेत. नुकतेच मावळ तालुक्यातील वरसवली गाव येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. पिंपरी, चिंचवड विधानसभेचे सर्व पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. मावळ लोकसभेचे संघटक रणजित शिरोळे, विधानसभेचे समन्वयक अमेय खोपकर यांनी आढावा घेतला. आरपीआयने महापालिकेच्या १५ जागांवर दावा ठोकत कामाला सुरुवात केली आहे. त्यांच्याकडून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने बैठका होत आहेत. तर वंचित आणि काँग्रेसकडून देखील पक्ष संघटनेकडे लक्ष देण्यात आले आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या हालचाली पाहता निवडुकीला रंगत येणार हे मात्र निश्चित आहेच. मात्र शहरातील राजकीय नेत्यांनी देखील आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केल्याचे पाहावयाला मिळत आहे.

### भाजपाचे कार्यकारिणीवर लक्ष ...

**» भाजपाच्या वतीने पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणीची निवड करण्यावर भर दिला आहे. शहराध्यक्ष पदाची निवड केल्यानंतर इतर पदावर काम करण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांच्या मुलाखती पार पडल्या आहेत. त्यांची यादी बनविण्यात आली आहे. ही यादी पक्षनेतृत्वाकडे पाठवून मंजुरी घेतली जाणार आहे. त्यानंतर शहरात कार्यकारिणीद्वारे पक्ष संघटन बळकट करण्यात येणार असल्याचे चित्र आहे.**

### शिउबाठा गट उमेदवाराच्या शोधात...

**» शिवसेनेमध्ये फूट पडल्यामुळे मावळचे खासदार श्रीरंग बारणे आणि शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाणे पसंद केले. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडे सध्या तरी कोणीही उमेदवार नसल्याचे दिसते. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी त्यांना या दोनही मतदारसंघात उमेदवाराचा शोध घ्यावा लागणार आहे. तसेच विधानसभा निवडणुकीतही त्यांना आपल्या पदाधिकाऱ्यांना ताकद द्यावी लागणार आहे.**



# पुणेकरांसाठी गुड न्यूज!

## 'रिंग रोड'साठी प्रशासनाचे मोठं प्लॅनिंग

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराभोवती १७३ किलोमीटर लांबीच्या रिंग रोडसाठी भूसंपादनाची प्रक्रिया वेगाने सुरू असून, आता उर्वरित जमिनीचे सक्तीचे भूसंपादन करावे लागणार आहे. या ५२५ हेक्टरच्या जागेचे सक्तीचे संपादन करण्यासाठी शेतकऱ्यांना अडीच ते तीन हजार कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. त्यामुळे राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) या संदर्भातील प्रस्ताव पाठविण्याच्या हालचाली जिल्हा प्रशासनाने सुरू केल्या आहेत.

पश्चिम रिंगरोडसाठीच्या जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. पश्चिम भागासाठी सुमारे सातशे हेक्टर जमिनीचे संपादन करावे लागणार आहे. त्यापैकी ४९१ हेक्टर क्षेत्रावरील शेतकऱ्यांनी जमीन देण्यासाठी संमती दिली असली तरी त्या संमतीमध्ये अडथळे आहेत. एका गटातील काही सातबाऱ्यावर असलेल्या कुटुंबीयांमधील नातेवाईकांनी संमती देताना सरसकट दिली नाही. संमती देणाऱ्या शेतकऱ्यांनी जागेच्या बांधावर असलेल्या बागेतील झाडे, विहिरी यांचे मूल्यांकन करण्याची तसेच त्या झाडांचे कुटुंबीयांमध्ये विभाजन करण्याची जबाबदारी भूसंपादन अधिकाऱ्यांवर टाकली आहे. संमतीमध्ये अडथळे आल्याने आत्तापर्यंत १६० हेक्टरचे संपादन होऊ शकले आहे. त्यासाठी ८३० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.

# पुण्यातील वाहतुकीला लागणार शिस्त!

## बेशिस्त वाहनचालकांच्या परवान्यावर लागणार 'फुली'

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील वाहतुकीची बेशिस्त दिवसेंदिवस वाढत आहे. त्याला आळा घालण्यासाठी वारंवार नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याचे पाऊल उचलले जाते. यंदा दरमहा सरासरी शंभर वाहनचालकांचे परवाना ३ ते ६ महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात आले आहेत.**



वाहतूक पोलिसांच्या प्रस्तावानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालयाने ही कारवाई केली आहे. वाहतुकीच्या नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांची यादी वाहतूक पोलिसांकडून आरटीओला पाठविली जाते. या वाहनचालकांचा परवाना निलंबित करावा, अशी शिफारसही करण्यात येते. पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावावर आरटीओकडून दर महिन्याच्या अखेरीस कारवाई केली जाते.

त्यात पोलिसांनी दिलेल्या गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो. जानेवारी ते जून या कालावधीत आरटीओकडून ६१८ वाहनचालकांचे परवाना निलंबित करण्यात आले. त्यात मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमभंगाच्या प्रकाराचा समावेश आहे. आरटीओकडून परवाना निलंबित करण्यात आल्याची माहिती संबंधित वाहनचालकाला ऑनलाइन दिली जाते. परवाना निलंबनाच्या कालावधीत चालक वाहन चालविताना आढळल्यास त्याच्यावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करून त्यांचे वाहनही जप्त केले जाऊ शकते.

> परवाना निलंबनाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर वाहनचालकांना पुन्हा वाहन चालविता येते. यात केवळ मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांचा अपवाद आहे. त्यांना वाहनाची तंदुरुस्ती तपासणी आणि वाहन चालविण्याची चाचणी पुन्हा द्यावी लागते. त्यानंतर त्यांना पुन्हा परवाना मिळतो.
> -संजीव भोर, प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी

> वाहतूक नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याची शिफारस वाहतूक पोलिसांकडून आरटीओकडे केली जाते. आमच्याकडून दर आठवड्याला अशा वाहनचालकांची यादी पाठविण्यात येते. दरमहा सुमारे शंभर ते दीडशे जणांची नावे पाठविली जातात.
> -विजयकुमार मगर, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा

# शिंदे, फडणवीस, पवारांचा निषेध!

## मराठा क्रांती मोर्चाकडून पत्रकार परिषद

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना येथे मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्टपासून आमरण उपोषणास बसले आहेत. मनोज पाटील यांना मंगळवारी उपोषण मागे घेण्याचीही विनंती करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा एक व्हिडीओ समोर आला असून त्यातील विधानाचा मराठा क्रांती मोर्चाकडून निषेध करण्यात आला.**



मराठा आरक्षणासंदर्भात राज्यस्तरीय बैठक झाल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेपूर्वीचा हा व्हिडीओ असल्याचे सांगितले जाते. व्हिडीओमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेच्या ठिकाणी येताच "आपण बोलून मोकळं व्हायचं, निघून जायचं", असं म्हटल्याचं माईकमध्ये रेकॉर्ड झालं. त्यावर देवेंद्र फडणवीसांनी त्यांना माईक चालू असल्याची आठवण करून दिली. पुढे अजित पवारही त्यावर "येस, येस" म्हणताना दिसत आहेत. यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याबाबत मराठा समाजाकडून तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत.

आज पुण्यातील मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या त्या संपूर्ण विधानाचा मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राजेंद्र कोंढरे, राजेंद्र कुंजीर, बाळासाहेब अमराळे, सचिन आडेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन निषेध केला. मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक म्हणाले की, मागील कित्येक वर्षांपासून मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी लढा देत आहे. पण कोणत्याही सरकारने मराठा समाजाच्या हिताचा निर्णय घेतला नाही. त्या विरोधात ५८ मोर्चे शांततेच्या मार्गाने काढले. पण काहीच झाले नाही. विधिमंडळात वेगळे, सभेत वेगळे विधान आणि शिष्टमंडळासमोर वेगळी भूमिका मांडण्याचे काम राज्यकर्त्यांनी केले आहे. या सर्व राज्यकर्त्यांनी मराठा समाजासह सर्वांची फसवणूक केली आहे. या सर्व गोष्टींना कंटाळून मनोज जरांगे हे आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसले आहे. आम्ही सर्वजण त्यांच्या पाठीशी आहोत. मनोज जरांगे यांच्या मागण्या तातडीने मान्य कराव्यात आणि आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी केली.

# राणेंवर गुन्हा दाखल करण्याची मागणी!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे महानगरपालिका मुख्य बांधकाम अभियंता प्रशांत वाघमारे यांना धमकी देणाऱ्या आमदार नीतेश राणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत शिवाजीनगर पोलीस स्टेशन पोलीस निरिक्षक यांना रिपब्लिकन जनशक्तीचे प्रदेशाध्यक्ष शैलेंद्र मोरे व संघटनेच्या कार्यकर्त्यांनी निवेदन देत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे . पुण्येश्वर मंदिराच्या प्रश्नाबाबत पुणे महानगरपालिकेच्या मुख्य गेटसमोर काही संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. आंदोलनात आमदार नितेश राणे, आमदार महेश लांडगे, मिलिंद एकबोटे, धीरज घाटे आदी नेते उपस्थित होते. वरील निषेधादरम्यान चिथावणीखोर भाषणे करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच आमदार नितेश राणे यांनी पुणे महानगरपालिकेचे मुख्य बांधकाम अभियंता प्रशांत वाघमारे यांच्याबद्दल खालच्या पातळीवर बोलले त्यांच्या भाषणात त्याचा गोषवारा देण्यात आला आहे .आहे. या भाषणाची व्हिडीओ क्लीप बंदोबस्तात असणाऱ्या पोलीसांकडे व माध्यमांच्याकडे उपलब्ध आहे. सदर प्रकरणी पुण्यश्वर मंदिराचा प्रश्न हा न्याय प्रविष्ठ असून सदर ठिकाणचे बांधकाम पाडण्याची नियमबाह्य मागणी जाणिवपूर्वक काही संघटनांकडून केली जात आहे. पुणे महानगरपालिकेकडून स्पष्टपणाने सांगुणही हे सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते दोन समाजात तेढ निर्माण होईल असे कृत्य करत आहेत आणि ते बांधकाम पाडले जात नाही याचा राग मनात ठेवुन आमदार नितेश राणे पुणे महानगरपालिकेचे मुख्य बांधकाम अभियंता प्रशांत वाघमारे यांना व्यक्तीगत दोष देत त्यांना मारण्याची धमकी देवुन त्यांचा अवमान केला आहे. या घटनेचा आम्ही या निवेदनाद्वारे जाहिर निषेध करत असून आमदार नितेश राणे याच्यावर कायदेशिर पोलीसांनी कारवाई करून अटक करा.

# पुनवळेतील कचरा डेपोच्या हट्टासाठी पिंपरी-चिंचवडकरांच्या पैशांवर टोळधाड?

## चंद्रपूरमधील जागेकरिता 15 कोटींचा खर्च : महापालिका प्रशासनाची भूमिका संशयास्पद

। पिंपरी ।महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी ।

**पुनवळेतील कचरा डेपो उभारणीच्या हट्टापायी पिंपरी-चिंचवडकरांच्या कररुपी पैशांवर महापालिका प्रशासन 'टोळधाड' करीत आहे का? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. पुनवळेतील कचरा डेपो करिता प्रशासन चंद्रपूरमध्ये वन विभागाला जागा देणार असून, त्यासाठी सुमारे १५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. त्याठिकाणी वनीकरण करण्यात येईल, असा दावा केला जात आहे. त्यामुळे चंद्रपूरातील वनीकरणावर महापालिका इतकी मेहरबान कशासाठी? हा खरा प्रश्न आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेची स्थापना १९८२ मध्ये झाली. शहराच्या स्थापनेपूर्वीच नगरपरिषद असताना शहरातील कचरा मोशी येथील मोकळ्या जागेत टाकला जात होता. १९९२ साली मोशीतील जागा कचरा डेपो म्हणून घोषित करण्यात आली. २०१८ पर्यंत या ठिकाणी लाखो मेट्रीक टन कचऱ्याचे डोंगर उभा राहिले. त्यामुळे मोशी आणि परिसरातील नागरी आरोग्य धोक्यात आले. स्थानिक लोकांना नरकयातना भोगाव्या लागल्या. त्यानंतर २०१८ मध्ये वेस्ट टू एनर्जी, बायोमायनिंग, सी एन्ड डी वेस्ट असे प्रकल्प कार्यान्वयीत करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाचे लोकार्पण महिनाभरापूर्वीच झाले. आता कचऱ्याचे डोंगर कमी होणार अशी अपेक्षा वाटत असतानाच महापालिका प्रशासनाने नवीन कचरा डेपो उभारण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

मोशीत कचरा डेपो झाला. त्यावेळी मोशी गावचा समावेश महापालिका हद्दीत नव्हता. पुनवळे गावाचा समावेश १९९७ मध्ये करण्यात आला. त्यावेळी कचरा डेपोसाठी जागा आरक्षित किंवा जाहीरही केली नव्हती. मग, २००८ साली महापालिका प्रशासनाने पुनवळेतील २२.८ हेक्टर जागा मंजूर केली आहे. मात्र, सदर जागा महापालिकेच्या ताब्यात नाही. ताब्यात नसलेल्या जागेवर महापालिका कचरा डेपो प्रस्तावित करणार असून, त्यासाठी स्थानिक नागरिक, सोसायटीधारक अशा किमान १५ हजार पिंपरी-चिंचवडकरांना वेठीस धरणार आहे.

### महापालिका प्रशासनाची अडचण...



सुरूवातीला महापालिका प्रशासनाने वन विभागाला मुळशी तालुक्यातील पिंपरी येथील जागा देण्याची तयारी दर्शवली होती. पण, त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात मुरूम असल्याचे कारण देत ती जागा वन विभागाने नाकारली. त्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील वन विभागाच्या शेजारील खासगी जमीन सूचवण्यात आली. तेथील सुमारे २३ हेक्टर जमीन खरेदी करण्याची प्रक्रिया चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने सुरू केली आहे. जागा मोणीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने ५ लाख ३४ हजार रुपये भरलेसुद्धा आहेत. या जमिनीच्या खरेदीसाठी प्रशासन सुमारे १५ कोटी रुपये खर्च करणार आहे. मग, प्रशासन चंद्रपूर ऐवजी पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीबाहेर लगतच्या परिसरात जागा खरेदी का करीत नाही? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### झाडांची किंमत मोजावी लागणार?

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन पुनवळेतील मोकळ्या जागेतील झाडे तोडून कचरा डेपो विकसित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्याबदल्यात चंद्रपूरमध्ये वन विभागाला जागा आणि झाडे लावून देण्याची हमी घेतली जात आहे. मात्र, तेथील शेतकऱ्यांनी जमिनीवरील झाडांचीसुद्धा किंमत द्यावी लागेल, अशी भूमिका घेतली आहे. चंद्रपूरमधील शेतकरी वृक्षांबाबत आणि पर्यावरणाबाबत आग्रही राहातत. मात्र, स्मार्ट सिटी... ग्रीन सिटी... क्लिन सिटी... अशी बिरुदावली लावणारी पिंपरी-चिंचवड महापालिका वृक्षतोड करुन कचरा डेपो उभारण्याची प्रगतीशील वाटचाल करीत आहे. हा सर्व खटाटोप नेमका कुणाच्या हितासाठी चालू आहे? असा प्रश्न सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना पडला आहे.**

# 'चिंचवड' मधील मतदान नोंदणीसाठी राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

## सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विविध राबवताहेत उपक्रम

। पिंपरी ।महाईन्यूज ।

**जिल्हा निवडणूक कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवड विधानसभा मतदारसंघात जास्तीत -जास्त मतदान नोंदणी व्हावी यासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विविध उपक्रम राबवत आहेत. याचाच एक भाग म्हणून सोमवारी (दि.११) कर संकलन व कर आकारणी विभागाच्या कार्यालयात प्रमुख राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.**

या बैठकीला भाऊसाहेब दिनकर कुटे, राकेश दिलीप काळे, रवींद्र गजानन यंगड, सागर सुरेश भोर, धनाजी तांबे (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी), मिलिंद सुरेश कंक, संतोष गुलाब कलाटे (भारतीय जनता पार्टी), रमेश नरवडे, अशोक वाळके (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपस्थित होते. यावेळी मतदार नोंदणी अधिकारी देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीबाबत माहिती देताना नोंदणी अधिकारी देशमुख म्हणाले "निवडणूक आयोगाच्या फॉर्म क्रमांक 9, 10,11, 11 अ आणि 11 ब याविषयी माहिती देण्यात आली. मतदार नोंदणी कार्यालयामार्फत चिंचवड विधानसभा मतदारसंघातील ब, ड, ग आणि ह या चार क्षेत्रीय कार्यालय व चिंचवड विधानसभा मतदार नोंदणी कार्यालय येथे प्रत्येक शुक्रवारी फॉर्म क्रमांक 9, 10,11, 11 अ आणि 11 ब प्रसिद्ध करण्यात येत असतात. हे सर्व फॉर्म त्या मतदार नवीन नोंदणी, नावे वगळणे, नावातील दुरुस्ती, पत्ता बदलण्यासाठी जे वेगवेगळ्या प्रकारच्या फॉर्म हे निवडणूक कार्यालयाला प्राप्त होत असतात, त्या फॉर्मचा सारांश हा वरील फॉर्ममध्ये असतो. या पाच ठिकाणची माहिती होण्यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यामध्ये सर्व फॉर्मची सखोल माहिती देऊन त्यांची मतेही जाणून घेण्यात आली.



### चिंचवडमध्ये 510 मतदान केंद्र

चिंचवड विधानसभा मतदारसंघात आजमितीस 510 मतदान केंद्र आहेत. परंतु मतदारांचा वाढता ओघ लक्षात घेता आणि आयोगाने घालून दिलेले निकष विचारात घेता मतदान केंद्रात होणाऱ्या बदलाविषयी व केंद्राच्या संभाव्य वाढी संदर्भात राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना इत्यंभूत माहिती देण्यात आली. तसेच मतदान केंद्र सुसूत्रीकरणाचा सक्षम अधिकारी व आयोगाकडून मान्य झाल्यानंतर सर्व संबंधितांना माहिती देण्यात येईल. मतदान यादीचे शुध्दीकरण होणे हे मतदान यंत्रणा व निवडणुकीमध्ये सहभागी होणाऱ्या राजकीय पक्ष व अपक्ष यांच्यासाठी गरजेचे आहे. तसेच परस्पर सहकार्याने काम करणे देखील तितकेच गरजेचे आहे.




**साधारण दोन आठवड्यांपूर्वी भारतीय कंपन्यांविषयी दोन महत्त्वाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. त्यातली पहिली होती गौतम अदानींविषयी. अदानींच्या अविश्वसनीय विकासाला स्टॉकची अफरातफर कारणीभूत असल्याची शक्यता हायडेनबर्ग अहवालामध्ये मांडण्यात आली होती. हा अहवाल आला होता या वर्षीच्या जानेवारी महिन्यात. दोन आठवड्यांपूर्वी आणखी एक बातमी प्रसिद्ध झाली.**

# आपण गमावलं, त्यांनी कमावलं!



या बातमीने हायडेनबर्ग अहवालात भर घातली असं म्हणायला हरकत नाही. या बातमीमध्ये दोन नावांचा समावेश आहे. नासेर अली शबन अहली आणि चांग चुंग लिंग. या दोघांनी अदानी ग्रुपच्या कोटय़वधी डॉलर्सच्या किमतीच्या स्टॉक्सचं वर्षानुवर्ष ट्रेडिंग केलेलं आहे. या दोघांचेही अदानी कुटुंबाशी जवळचे संबंध आहेत. अदानींच्या कंपन्यांशी संलग्न असलेल्या इतर कंपन्यांमध्ये त्यांचे शेअर्स आहेत आणि काहींमध्ये ते संचालकही आहेत. या कागदपत्रांनुसार, अदानी ग्रुपच्या स्टॉकमध्ये ट्रेड करण्यासाठी या दोघांनी इनव्हेस्टमेंट फंड्स वापरले होते. त्यांना अदानी कुटुंबातील एका ज्येष्ठ सदस्याचं नियंत्रण असलेल्या कंपनीकडून सूचना मिळत होत्या. दुसरी बातमी होती वेदान्ता ग्रुपविषयी. खाण आणि ऊर्जा क्षेत्रातली ही खूप मोठी कंपनी. भारताचे पर्यावरणविषयक नियम शिथिल करण्यासाठी या कंपनीने लॉबिंग केलं. तोही ग्रामीण भारतात कोविड १९ च्या दुसऱ्या लाटेने हाहाकार माजवलेला असतानाच्या काळात. लोकांशी सल्लामसलत न करता भारत सरकारने हे बदल कसे मंजूर केले आणि बेकायदेशीर मार्गाने ते कसे लागू केले याचा पर्दाफाश या बातमीमध्ये करण्यात आला होता. खाण व्यवसायात ५० टक्क्यांपर्यंत उत्पादन काढण्यासाठी नव्याने पर्यावरणविषयक मंजुरी घ्यावी लागते. वेदान्ताने तशी परवानगी घ्यावी लागू नये यासाठी जोरदार प्रयत्न केले. केर्न इंडिया ही वेदान्ता समूहातली तेल कंपनी आहे. सरकारी लिलावामध्ये मिळालेल्या तेल ब्लॉक्सचं उत्खनन करण्याची परवानगी मिळवण्यासाठी जनसुनावणी घेणं बंधनकारक असतं. हे बंधन काढून टाकण्याकरता केर्न इंडियाने प्रयत्न केले आणि त्यात ते यशस्वीही झाले. त्यानंतरच्या काळात केर्नच्या सहा वादग्रस्त तेल प्रकल्पांना राजस्थानमध्ये मंजुरी मिळालेली आहे. स्थानिक पातळीवर त्याला विरोध होत असतानाही. वेदान्ताशी संबंधित दोन ट्रस्ट्सनी २०१६ ते २०२० या काळात भारतीय जनता पक्षाला ६.१६ मिलयन डॉलर्स (५१ कोटींपेक्षा जास्त) एवढय़ा देणग्या दिलेल्या आहेत. दोन्हीमधला परस्परसंबंध इथे स्वच्छ दिसतोय. या दोन्ही बातम्या ओसीसीआरपी- ऑर्गनाइज्ड क्राइम अॅण्ड करप्शन पीरिटिंग प्रोजेक्ट- या शोधपत्रकारिता करणाऱ्या नेटवर्कने प्रसिद्ध केल्या आहेत. ओसीसीआरपीचे पत्रकार जगातल्या सहा खंडांमध्ये कार्यरत असून त्यांचं मुख्यालय ॲमस्टरडॅम इथे आहे. अदानींवरच्या बातमीवर आनंद मंगनाळे आणि रवी नायर यांनी काम केलं, तर वेदान्तावरची बातमी अक्षय देशमानेने केली. हे तिघेही दिल्लीत राहणारे स्वतंत्र पत्रकार आहेत. सर्वसाधारणपणे, ज्यांच्याकडे आर्थिक बळ आहे ती माध्यमं अशा प्रकारच्या शोध पत्रकारितेचं काम हाती घेतात. कारण अशा बातम्या शोधायच्या तर त्यासाठी वेळ लागतो, संसाधनं लागतात. पण भारतात हे घडायचं आता थांबलेलं आहे. मग, मेहनत घेऊन, माहिती खणून काढलेल्या बातम्या तुमच्यासमोर येतात तेव्हा प्रसारमाध्यमं काय करतात? भारतीय प्रसारमाध्यमं त्याकडे दुर्लक्ष करत नाहीत. ती इतकी कणाहीन झालेली आहेत की, अनेक महिने काम करून, देशातल्या शक्तिशाली लोकांविषयी माहिती खोदून काढण्याचा धोका पत्करून ज्यांनी या बातम्या केल्या त्या पत्रकारांच्या आणि संस्थेच्या विश्वासार्हतेवरच ते संशय व्यक्त करू लागतात. मुख्य प्रवाहातल्या प्रसारमाध्यमांनी या बातम्यांवर चर्चा करायला सुरुवात केली तेव्हा अशा बातम्या येण्यामागे कोणती 'वेळ' साधण्यात आली आहे हा त्यांचा मुख्य विषय होता. जी ट्वेंटीच्या तोंडावर ओसीसीआरपीचा हेतू नरेंद्र मोदी यांना बदनाम करण्याचा होता असा सूर टीव्हीवरच्या अँकर्सनी लावला. सर्व पुराव्यांसहित भरपूर संशोधन करून केलेल्या बातमीला 'भारतीय उद्योगांवर झालेला हल्ला' असं लेबल लावण्यात आलं. माध्यमांमध्ये आलेल्या प्रत्येक बातमीमध्ये ओसीसीआरपीचं वर्णन वादग्रस्त अरबपती जॉर्ज सोरोस यांची गुंतवणूक असलेली संस्था म्हणून करण्यात आलं. जॉर्ज सोरोसने आजवर विशिष्ट सामाजिक- राजकीय विचारसरणीला आर्थिक मदत केलेली आहे.

## संपादकीय »

# 'इनसायडरां'ची इडा!

***देशाच्या प्रगतीसाठी नागरिकांची उद्यमशीलता जितकी महत्त्वाची तितकीच या उद्यमशीलतेचे नियमन करणाऱ्या नियामकांची नियतही महत्त्वाची.***

हे नियामक जितके निष्पक्ष आणि नि:स्पृह तितकी प्रगतीची संधी अधिक समान; हे वैश्विक सत्य. त्यातही भांडवली बाजारासारख्या व्यवस्थेचा कणा हे नियामक असतात. तो ताठ असायला हवा. या नियामकाच्या नियतीविषयी जाहीर संशय घेतला जात असेल तर तो संबंधितांकडून तातडीने दूर केला जायला हवा अथवा वरिष्ठांनी त्याची दखल घेऊन गढूळपणा दूर करायला हवा. तो क्षण भांडवली बाजाराची नियंत्रक असलेल्या 'सेक्युरिटी एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया', म्हणजे 'सेबी'बाबत पुन्हा एकदा येऊन ठेपला आहे. निमित्त ठरले आहे ते उद्योगपती गौतम अदानींसंदर्भात सध्या सुरू असलेला वाद. त्याचे जे काही व्हायचे ते होईल. अदानी यांची एकंदर पोहोच लक्षात घेता शक्यता ही की काही होणारही नाही. तसे झाले तरी ते अपेक्षेप्रमाणेच होईल. यात धक्का बसावा असे काही नाही. म्हणजे मुद्दा अदानी आणि त्यांच्या उद्योगक्षमतेचा नाही. ती त्यांनी सिद्ध केलेलीच आहे.

**जी-२० शिखर परिषदेनिमित्त नवी दिल्लीत आलेल्या जागतिक नेत्यांबरोबर सर्वोच्च पातळीवर द्विपक्षीय चर्चा हा महत्त्वाचा समांतर उपक्रम होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या नेत्यांबरोबर सविस्तर आणि भविष्यवेधी चर्चा केली, त्यात अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्यानंतर महत्त्वाचे नेते होते सौदी अरेबियाचे युवराज आणि धोरणकर्ते मोहम्मद बिन सलमान. त्यांच्या भारतभेटीदरम्यान दोन देशांमध्ये जवळपास ५० करार झाले.**

# सौदी मैत्रीचे बदलते रंग..!



भारत-सौदी संबंध ऊर्जा व्यवहारापलीकडे जायला हवेत आणि यासाठी सौदी अरेबिया भारतात मोठी गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे, असे आश्वासन मोहम्मद बिन सलमान यांनी दिले. तर सौदी अरेबियाशी व्यूहात्मक द्विपक्षीय संबंध वाढवण्यावर भर देणार असल्याचे मोदी यांनी म्हटले. त्यांचा रोख प्रामुख्याने जी-२० परिषदेच्या अंतिम मसुद्यात समाविष्ट झालेल्या भारत – पश्चिम आशिया – युरोप व्यापार मार्गिकिकडे (कॉरिडॉर) होता. हे झाले दीर्घकालीन प्रकल्प. पण विद्यमान किंवा नजीकच्या प्रकल्पांचे काय? सौदी सहकार्याने भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर म्हणजे कोकणात बारसू येथे अत्यंत महत्त्वाचा तेलशुद्धीकरण प्रकल्प होऊ घातला आहे. नाणार प्रकल्प म्हणून ओळखल्या गेलेल्या या प्रकल्पातील सौदी गुंतवणूक ५० अब्ज डॉलर्स (साधारण ४,१४,५०० कोटी रुपये) इतकी आहे. या देशाकडून प्रस्तावित १०० अब्ज डॉलर्स गुंतवणुकीपैकी अर्धी तेलशुद्धीकरण प्रकल्पासाठी आहे. पण स्थानिक विरोध आणि राज्यातील पक्षीय राजकारण यामुळे नाणार येथून बारसू येथे सरकलेल्या या प्रकल्पासमोरील अनिश्चिततेचे ढग पुरेसे विरलेले नाहीत. त्यामुळेच प्रकल्पपूर्तीसाठी आता दोन्ही देशांमध्ये संयुक्त कृतिगट स्थापण्याचे ठरले. मोदी-सलमान भेटीचे हे एक महत्त्वाचे फलित. प्रकल्पाच्या प्रगतीवर हा गट देखरेख ठेवणार आहे. आतापर्यंत या मुद्द्यावर सौदी अरेबियाकडून थेट देखरेख ठेवली जाण्याचा विषय चर्चिला गेला नव्हता. आता द्विराष्ट्रीय नेते आणि शिष्टमंडळांच्या चर्चेच्या टेबलावर तो आला आहे. केंद्रात आणि राज्यात एकच सरकार असल्यामुळे सौदी अरेबियाच्या मदतीने हा प्रकल्प पूर्णत्वाला नेण्याचा आग्रह मोदींकडून होऊ शकतो. जगात जे मोजके देश सध्या सगळ्यांचेच मित्र म्हणवले जाऊ शकतात, त्यांच्यामध्ये भारत, कतार, तुर्की यांच्या बरोबरीने सौदी अरेबियाचे नाव घ्यावे लागेल. गेल्या दोन वर्षांमध्ये इस्रायल आणि गेल्या दोन महिन्यांमध्ये इराण या कट्टर शत्रूंशी जुळवून घेण्याचे धोरण सौदी अरेबियाने अंगीकारले आहे. संघर्षांतून किंवा इतर कोणत्याही कारणास्तव जागतिक व्यापारात पडणाऱ्या खंडाचा फटका सौदी अरेबियासारख्या प्राधान्याने खनिज तेल निर्यातदार देशांना बसतो. त्यामुळे जगभरात शत्रू निर्माण करत बसण्याचा सोस सौदी अरेबियासारख्या निर्याताभिमुख अर्थव्यवस्थेला परवडणारा नाही. मध्यंतरी 'द वॉशिंग्टन पोस्ट'चे स्तंभलेखक जमाल खाशोगजी यांची हत्या घडवून आणल्याचा ठपका मोहम्मद बिन सलमान यांच्यावर अमेरिकेतील माध्यमे, विचारवंत आणि काही राजकीय नेत्यांनी ठेवला होता. त्यांची शंका बहुधा रास्तच होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुख्यमंत्री शिंदेंसह 16 आमदार अपात्र ?

## ठाकरे गटाची रणनीती ठरली? असीम सरोदे मांडणार बाजू

| मुंबई | महाईन्यूज |
प्रतिनिधी|

**सर्वोच्च न्यायालयाने शिवसेनेतील सत्तासंघर्षाचा निर्णय जवळपास लिहून दिला आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांच्या सुनावणीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह 16 बंडखोर आमदार अपात्र ठरणार हे निश्चित आहे, असे शिवसेना (ठाकरे) नेते अनिल परब यांनी बुधवारी स्पष्ट केले. सरकार पडणार असल्याचे ठावूक असल्यामुळेच भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस फोडल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.**



शिवसेनेच्या 16 बंडखोर आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी गुरुवारपासून सुरू होणार आहे. अनिल परब यांनी या प्रकरणी बुधवारी पंढरपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना हे सर्वच आमदार अपात्र ठरणार असल्याचा दावा केला. ते म्हणाले की, उद्यापासून शिवसेनेच्या 16 आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी सुरू होणार आहे. सुप्रीम कोर्टाने या प्रकरणाचा निकाल जवळपास लिहून दिला आहे. आता अध्यक्षांना केवळ सुनावणी करायची आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत. तसेच त्याचा अर्थही लावला आहे. आता केवळ निर्णय येणे बाकी आहे. यामुळे हे सरकार केवळ वेळकाढूपणा करत आहे, असे अनिल परब म्हणाले. सुप्रीम कोर्टाने राज्यपालांची भूमिका, घटनेतील 10 वे कलम आदी सर्व गोष्टी स्पष्ट केल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह 16 आमदार अपात्र ठरतील. हे आमदार अपात्र ठरणे म्हणजे सरकार कोसळणे आहे. अन्य 23 आमदारांची याचिका प्रलंबित असल्यामुळे हा केवळ वेळकाढूपणा आहे, असे परब म्हणाले. यावेळी त्यांनी भाजपने शिंदे सरकार पडणार असल्याचे ठावूक असल्यानेच राष्ट्रवादी फोडल्याचाही आरोप केला. ते म्हणाले की, भाजपला शिंदे सरकार कोसळणार असल्याचा पूर्ण अंदाज आहे. त्यामुळे त्यांनी सत्ता राखण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडली. आता शिवसेनेसारखीच राष्ट्रवादीनेही अपात्रतेची कारवाई सुरू केली आहे. मराठा समाजाला त्यांचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण सिद्ध झाल्याशिवाय शाश्वत आरक्षण मिळणार नाही. यासाठी योग्य इम्पेरिकल डेटा मागास आयोगाने देणे गरजे असल्याचेही अनिल परब यांनी यावेळी स्पष्ट केले. सध्या कुणबी विरुद्ध मराठा असा वाद निर्माण होऊन सामाजिक आरोग्य बिघडत आहे. त्यामुळे या प्रकरणी लवकरात लवकर तोडगा काढण्याची गरज आहे, असेही अनिल परब यावेळी म्हणाले. राज्यातील सत्ता संघर्षानंतर विधानसभा अध्यक्षांसमोर शिवसेना आमदारांच्या पात्र-अपात्रते संदर्भातील महत्त्वाची सुनावणी उद्यापासून सुरू होत आहे. या सुनावणीला कसे सामोरे जायचे याचे नियोजन उद्धव ठाकरे गटाने केले आहे. त्यासाठी वकीलांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सर्व आमदारांचे उत्तर एकच असावे, यासाठी आमदारांकडूनही तयारी करून घेण्यात आली आहे. शक्यता सर्व प्रश्नांची उत्तर वकीलांनीच द्यावे, अशी सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना एकनाथ शिंदे यांनी बंड करत शिवसेनेतील चाळीस आमदारांसोबत वेगळा निर्णय घेतला होता. त्या नंतर आधी सर्वोच्च न्यायालय आणि निवडणूक आयोगात दोन्ही गटात लढाई सुरू आहे. मात्र, आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांनीच घ्यावा, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. यासाठी अनेक दिवसांची प्रतिक्षा आता संपली असून उद्यापासून नार्वेकर या प्रकरणाची सुनावणी करणार आहेत.

### आधी विधिमंडळात बैठक

आमदार अपात्रतेच्या सुनावणीच्या आधी ठाकरे गटाच्या सर्व आमदारांची बैठक विधिमंडळात होणार आहे. विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या दालनात सर्व आमदारांना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. येथे चर्चा झाल्यानंतर सर्व आमदार सुनावणीसाठी उपस्थित राहतील. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना गटाच्या सर्व आमदारांनी वकील पत्र अध्यक्षांकडे सादर केले आहे. ज्यामध्ये दोन पानी लेखी उत्तराचाही समावेश करण्यात आला आहे. यात ठाकरे गटाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील देवदत्त कामत आणि वकील असीम सरोदे हे बाजू मांडणार आहेत.

---

# संपादित व्हिडिओ फिरवणे खोडसाळपणाचे : मुख्यमंत्री

## व्हिडिओ प्रकरणी शिंदे, पवार, फडणवीस तिन्ही नेत्यांना होताहेत ट्रोल

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आतापर्यंत अनेकदा आपले सरकार मराठा आरक्षणाच्या मुद्दावर अत्यंत गंभीर असल्याचा पुनरुच्चार केला आहे. पण त्यांच्या एका व्हिडिओमुळे त्यांच्याच दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या व्हिडिओत शिंदे आपण केवळ बोलून मोकळे व्हायचे असे म्हणताना दिसून येत आहेत. त्यांचा यासंबंधीचा व्हिडिओ सोशल मिडियात चांगलाच व्हायरल झाला आहे.**

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा संपादित व्हिडिओ खोडसाळपणे माध्यमांत फिरवणे अत्यंत निंदनीय असल्याची भावना व्यक्त केली आहे. जालनाच्या आंतरवाली सराटीत मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात आंदोलन सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना उपोषण मागे घेण्याचे आवाहन केले आहे. त्यातच आता मुख्यमंत्री शिंदेंसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या पत्रकार परिषदेपूर्वीचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

त्या व्हिडिओ प्रकरणी या तिन्ही नेत्यांना ट्रोल केले जात आहे. या व्हिडिओत शिंदे आपण केवळ बोलून मोकळे व्हायचे, असे म्हणताना दिसून येत आहेत. शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या संभाजी भिडे यांनी मंगळवारी मनोज जरांगे यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्री शिंदे लबाड नाहीत, फडणवीस फसवणूक करणार नाहीत, तर अजित पवार काळीज असणारा माणूस असल्याचा दावा केला होता. यावेळी त्यांनी जरांगेंना उपोषण मागे घेण्याचीही विनंती केली होती. त्यांच्या या दाव्याचा संदर्भ देत नेटकरी या व्हिडिओवरून या तिन्ही नेत्यांना ट्रोल करत आहेत. शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनीही या व्हिडिओप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला आहे. मराठा आरक्षणाप्रकरणी सोमवारी रात्री सर्वपक्षीय बैठक झाली. त्यानंतर पत्रकार परिषद सुरू होण्यापूर्वी सरकारमधील या 3 प्रमुख नेत्यांतील संवाद तरी पाहा. "आपण बोलून मोकळं व्हायचं" हे त्यांचे उद्गार मराठा आरक्षणासंबंधी त्यांची असलेली अनास्था दर्शवित आहे, असे निंबाळकर यांनी म्हटले आहे. मराठा आरक्षणासाठी सर्व समाजबांधव पोटतिडकीने राज्यभर आंदोलन करीत आहेत. अनेकांनी अन्नत्याग केला आहे. विविध माध्यमातून राज्य सरकारला जागे करण्याचा प्रयत्न आपला मराठा तरुण करताना दिसतो आहे. तरीही हे सरकार केवळ वेळकाढूपणा करीत आहे. एकीकडे समाज जीवन मरणाचा संघर्ष शांततेच्या माध्यमातून करीत असताना सरकारचे हे ट्रीपल इंजिन बघा किती गांभीर्याने हा विषय घेत आहेत.. आरक्षण देण्याची दानत नसेल तर तसे सांगा पण, किमान जखमेवर मीठ तरी चोळू नका. समाज आता तुमच्याकडे डोळसपणे बघतोय, असेही निंबाळकर आपल्या ट्विटमध्ये म्हणालेत.



### मराठा आरक्षणविषयक एकमत

मराठा आरक्षणविषयक सर्वपक्षीय बैठकीनंतर सह्याद्री अतिथिगृह येथे पत्रकार परिषदेपूर्वी आपला आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचा माईकवरील संवाद 'सोशल मीडिया'वरून चुकीच्या पध्दतीने संपादित करुन फिरविणे अत्यंत खोडसाळपणाचे आहे. तसेच मराठा आरक्षणाबाबत पहिल्यांदाच अशा सर्व पक्षांच्या नेत्यांना एकत्र बोलावून या विषयी त्यांचे एकमत घेण्यात आले आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

# केरळमध्ये निपाहचा धोका वाढला!

## » 4 जिल्ह्यांमध्ये अलर्ट; तपासासाठी पुण्याहून पथक येणार

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळमधील कोझिकोडमध्ये निपाह व्हायरसमुळे दोन जणांचा मृत्यू झाल्यानंतर कन्नूर, वायनाड आणि मलप्पुरम जिल्ह्यात अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोझिकोडमध्ये सतर्कतेच्या पार्श्वभूमीवर 7 ग्रामपंचायतींना कंटेनमेंट झोन करण्यात आले आहेत. कंटेनमेंट झोनमधील सर्व शैक्षणिक संस्था, अंगणवाडी केंद्र, बँका आणि सरकारी संस्था बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. लोकांना मास्क घालणे बंधनकारक आहे. फक्त औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंची विक्री करणारी दुकाने सकाळी 7 ते सायंकाळी 5 या वेळेत उघडण्यास परवानगी आहे.**



बुधवारी राज्य सरकारने विधानसभेत सांगितले की, पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी (NIV) ची टीम आज केरळमध्ये येणार आहे. कोझिकोड मेडिकल कॉलेजमध्ये एक लॅब बांधली जाईल, ज्यामध्ये NIV टीम निपाह चाचणी आणि वटवाघळांचे सर्वेक्षण करेल. मंगळवारी रात्री केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी तातडीची बैठक बोलावली होती.

यामध्ये सर्व आमदार, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी आणि आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांशी निपाह विषाणूचा सामना करण्यासाठी आवश्यक प्रयत्नांबाबत चर्चा करण्यात आली. आरोग्यमंत्र्यांनी सांगितले की, परिसरात कॉन्टॅक्ट ट्रेसिंगचे काम सुरू आहे. आरोग्य विभागाने इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल अँड रिसर्च (ICMR) सोबतही चर्चा केली आहे आणि राज्यातील खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या उपचारासाठी मोनोक्लोनल अँटीबॉडीज उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे.

केरळमध्ये आतापर्यंत निपाह व्हायरसची चार प्रकरणे समोर आली असून, त्यात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. निपाहमुळे पहिला मृत्यू 30 ऑगस्टला झाला आणि दुसरा मृत्यू 11 सप्टेंबरला झाला. केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी सांगितले की, दोन्ही मृतांचे नमुने पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी (NIV) मध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. त्यांनी आणखी दोन रुग्ण सापडल्याची पुष्टी केली होती. यामध्ये एका 9 वर्षांच्या मुलाचा आणि एका 24 वर्षांच्या तरुणाचा समावेश आहे. दोघांवर उपचार सुरू आहेत. आरोग्यमंत्र्यांनी स्थानिक आरोग्य कर्मचाऱ्यांना त्यांच्या भागात कडक दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी 12 सप्टेंबर रोजी एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, निपाह व्हायरसमुळे दोन लोकांच्या मृत्यूवर सरकार गंभीर आहे. मृतांच्या संपर्कात असलेल्या लोकांचा शोध घेण्यात येत आहे.

कोझिकोडमध्ये आरोग्य विभागाने अलर्ट जारी केला आहे. राज्यात निपाहचा उद्रेक अद्याप अधिकृतपणे घोषित झालेला नाही. 2018 मध्ये केरळमधील कोझिकोड आणि मलप्पुरम जिल्ह्यात निपाह व्हायरसमुळे 17 लोकांचा मृत्यू झाला होता. याआधी कोचीमध्ये 2019 मध्ये निपाह व्हायरसचा एक केस समोर आला होता. त्याच वेळी, 2021 मध्ये कोझिकोडमध्येही निपाह व्हायरसचा एक केस आढळला होता.

### जिल्हाधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेतली

» केरळमध्ये आतापर्यंत निपाह व्हायरसची चार प्रकरणे समोर आली असून, त्यात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. निपाहमुळे पहिला मृत्यू 30 ऑगस्टला झाला आणि दुसरा मृत्यू 11 सप्टेंबरला झाला. केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी सांगितले की, दोन्ही मृतांचे नमुने पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी (NIV) मध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. त्यांनी आणखी दोन रुग्ण सापडल्याची पुष्टी केली होती. यामध्ये एका 9 वर्षांच्या मुलाचा आणि एका 24 वर्षांच्या तरुणाचा समावेश आहे. दोघांवर उपचार सुरू आहेत. आरोग्यमंत्र्यांनी स्थानिक आरोग्य कर्मचाऱ्यांना त्यांच्या भागात कडक दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# चंद्राबाबू नायडू न्यायालयीन कोठडीतच राहणार!

## » चंद्राबाबूंच्या समर्थकांनी रस्त्यापासून ते विमानापर्यंत केली निदर्शने

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि टीडीपी प्रमुख चंद्राबाबू नायडू यांना सीआयडीने 9 सप्टेंबर रोजी 371 कोटी रुपयांच्या कौशल्य विकास घोटाळ्यात अटक केली होती. याविरोधात चंद्राबाबूंच्या वकिलांनी उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल केल्या. त्यावर बुधवारी सुनावणी झाली. आंध्र उच्च न्यायालयाने एसीबी न्यायालयाच्या कारवाईला अंतरिम स्थगिती दिली आहे. तसेच सीआयडीला नायडूंना 18 सप्टेंबरपर्यंत ताब्यात न घेण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, नायडू न्यायालयीन कोठडीतच राहणार आहेत.**




या प्रकरणाची पुढील सुनावणी 19 सप्टेंबर रोजी होणार आहे. नायडू यांच्या अटकेपासून त्यांचे समर्थक सातत्याने निदर्शने करत आहेत. अशाच एका कार्यकर्त्याने 12 सप्टेंबरला विशाखापट्टणमला जाणाऱ्या विमानात विरोध केला. सोशल मीडियावर समोर आलेल्या एका व्हिडिओमध्ये अदारी किशोर नावाचा एक व्यक्ती विमानात 'सेव्ह डेमोक्रसी' बॅनर घेऊन उभा होता. आंध्र प्रदेश पोलिसांनी त्याला विमानतळावरून अटक केली. चंद्राबाबूंच्या अटकेच्या निषेधार्थ तेलुगू देसम पक्षाने राज्यात बंद पुकारला होता. कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी निदर्शने केली. त्याचवेळी सत्ताधारी पक्ष YSRCP च्या कार्यकर्त्यांनी चंद्राबाबूंच्या अटकेचा आनंद साजरा केला. रविवारी रात्री अनेक ठिकाणी फटाके फोडण्यात आले. या प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता नसल्याचे सीआयडीच्या तपासात आढळून आले. असे असतानाही निविदा न काढता प्रकल्प सुरू करण्यात आला. या सामंजस्य करारांतर्गत सीमेन्स कंपनी स्वतःच्या वतीने या प्रकल्पात गुंतवणूक करणार होती. मात्र, कंपनीने स्वतःची कोणतीही गुंतवणूक केलेली नाही. याउलट, राज्य सरकारने वाटप केलेले 371 कोटी रुपये विविध शेल कंपन्यांमध्ये वितरीत करण्यात आले – अलाईड कॉम्प्युटर्स, स्किलर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, नॉलेज पोडियम, कॅडन्स पार्टनर्स आणि ईटीए ग्रीन्स. त्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली. CID ने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, 2018 मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे या घोटाळ्याची तक्रार आली होती. मात्र, त्यानंतर सत्तेत असलेल्यांनी तपास थांबवण्याचा प्रयत्न केला आणि राज्य सचिवालयातून महत्त्वाची कागदपत्रे काढून घेतली. सध्याच्या सरकारच्या तपासापूर्वी जीएसटी इंटेलिजन्स विंग आणि आयटी विभागही या घोटाळ्याची चौकशी करत होते. सीमेन्स ग्लोबल कॉर्पोरेट ऑफिसने अंतर्गत तपासणी केली, ज्यामध्ये असे आढळून आले की प्रकल्प व्यवस्थापकाने शेल कंपन्यांना हवाला व्यवहाराच्या रूपात प्रकल्पाचे पैसे हस्तांतरित केले होते. सीमेन्स ग्लोबलने आरोपी मॅनेजरला नोकरीवरून काढून टाकले होते.

### सीआयडीने तपासात अनेक खुलासे

» या प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता नसल्याचे सीआयडीच्या तपासात आढळून आले. असे असतानाही निविदा न काढता प्रकल्प सुरू करण्यात आला. या सामंजस्य करारांतर्गत सीमेन्स कंपनी स्वतःच्या वतीने या प्रकल्पात गुंतवणूक करणार होती. मात्र, कंपनीने स्वत:ची कोणतीही गुंतवणूक केलेली नाही. याउलट, राज्य सरकारने वाटप केलेले 371 कोटी रुपये विविध शेल कंपन्यांमध्ये वितरीत करण्यात आले – अलाईड कॉम्प्युटर्स, स्किलर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, नॉलेज पोडियम, कॅडन्स पार्टनर्स आणि ईटीए ग्रीन्स. त्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली.

# सोनाक्षीने मुंबईत खरेदी केले अपार्टमेंट!

सोनाक्षी सिन्हाने नुकतेच मुंबईतील एका आलिशान इमारतीत नवीन घर घेतले आहे. अभिनेत्रीच्या या नवीन घराची किंमत अंदाजे 11 कोटी रुपये आहे. सोनाक्षीने वांद्रे येथील केसी रोडजवळील 81 ओरियट बिल्डिंगच्या वरच्या मजल्यावर घर घेतले आहे. रिअल इस्टेटशी संबंधित वेबसाइट झापकीच्या माध्यमातून मिळालेल्या डॉक्युमेंटनुसार, सोनाक्षीचे नवीन घर 2208.7 स्क्वेअर फूटमध्ये पसरले आहे. अभिनेत्रीने 29 ऑगस्ट रोजी तिच्या नवीन घराची नोंदणी केली. त्यासाठी त्यांनी 55 लाख रुपये मुद्रांक शुल्क आणि 30 हजार रुपये मालमत्ता नोंदणीही भरली आहे. अभिनेत्रीच्या या घरात लॉबी, टॉयलेट आणि एअर हँडलिंग युनिटसारख्या सुविधा आहेत. याशिवाय सोनाक्षीच्या बिल्डिंगमध्ये 4 कार पार्किंगही उपलब्ध आहे. कागदपत्रांनुसार, सोनाक्षीच्या घरात 1,653.67 स्क्वेअर फूटचे टेरेसही आहे. अभिनेत्रीच्या या नवीन घरातून माहीम खाडी आणि वांद्रे वरळी सी लिंकचे दृश्य दिसते. सोनाक्षीने मार्च 2020 मध्ये बांद्रा येथे तिचे पहिले अपार्टमेंट घेतले होते. त्याची किंमत सुमारे 14 कोटी रुपये आहे. सोनाक्षीपूर्वी अभिनेता अर्जुन कपूरने या टॉवरच्या 19व्या मजल्यावर अपार्टमेंट विकत घेतले होते.



पण त्याने मे 2022 मध्ये 16 कोटी रुपयांना विकले होते. त्याची गर्लफ्रेंड मलायका अरोरा हिनेही या इमारतीत 14.5 कोटी रुपयांना अपार्टमेंट बूक केले होते. बिग बॉस स्टार करण कुंद्राने 2022 मध्ये याच टॉवरमध्ये 14 कोटी रुपयांना एक अपार्टमेंट खरेदी केले होते.अभिनेत्रीने 29 ऑगस्ट रोजी तिच्या नवीन घराची नोंदणी केली. त्यासाठी त्यांनी 55 लाख रुपये मुद्रांक शुल्क आणि 30 हजार रुपये मालमत्ता नोंदणीही भरली आहे. अभिनेत्रीच्या या घरात लॉबी, टॉयलेट आणि एअर हँडलिंग युनिटसारख्या सुविधा आहेत. याशिवाय सोनाक्षीच्या बिल्डिंगमध्ये 4 कार पार्किंगही उपलब्ध आहे.

# श्रीदेवींच्या आठवणीला उजाळा!

'क्युंकी सास माँ, बहू बेटी होती है' या टीव्ही शोचा भाग असलेली अभिनेत्री नाविका कोटिया ही आधी बाल अभिनेत्री होती. 10 वर्षांपूर्वी ती दिवंगत अभिनेत्री श्रीदेवीसोबत 'इंग्लिश विंग्लिश' चित्रपटात दिसली होती. गेल्या काही वर्षांत नाविकामध्ये खूप बदल झाले आहेत.अलिकडेच, दिव्य मराठीशी एका खास संवादादरम्यान बोलताना तिने वजन कमी करणे आणि तिच्या संघर्षांबद्दल सांगितले. संवादादरम्यान तिनं श्रीदेवीशी संबंधित काही आठवणीही शेअर केल्या. "मी आणि शिवांश कोटिया, ज्यांनी श्रीदेवीजींच्या मुलाची भूमिका केली होती, आम्ही दोघांनी या चित्रपटासाठी ऑडिशन दिले होते. चित्रपटाच्या एका बैठकीदरम्यान, निर्मात्यांना कळले की आम्ही भाऊ आणि बहीण आहोत. यानंतर त्यांनी आमचे पुन्हा ऑडिशन घेतले आणि निवड झाली. शूटिंगदरम्यान आम्ही खूप एन्जॉय केले कारण आम्ही सेटवर भाऊ-बहीण एकत्र होतो, आमचे आई-वडील उपस्थित होते. या चित्रपटाने आमच्यासाठी अनेक दरवाजे उघडले. अभिनेत्याचे कौशल्य सुधारण्याची संधी मिळाली. त्यासाठी मी सदैव कृतज्ञ आहे. एवढ्या मोठ्या स्टार असूनही त्यांच्याकडे अजिबात अहंकार नव्हता. त्या संपूर्ण सेटची, संपूर्ण क्रूची काळजी घ्यायच्या. त्यांच्या घरून आमच्यासाठी जेवण यायचे. कितीही ताप आला तरी त्यांनी काम करायला कधीच नकार दिला नाही. त्या त्यांचे काम उत्तम पद्धतीने करायच्या. त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. खर सांगू, मी आयुष्यभर माझ्या वजनाशी झगडत आले आहे. मी लहानपणापासूनच एक गुबगुबीत मुलगी होते. त्यात हेही वास्तव आहे की, आपण ज्या इंडस्ट्रीत आहोत.




# मला बिग ब्रदरमधून जास्त लोकप्रियता मिळाली

शिल्पा शेट्टीचा पुढचा चित्रपट 'सुखी' आहे. सध्या अभिनेत्री या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. एका मुलाखतीत, अभिनेत्रीने तिच्या कारकिर्दीतील ब्रिटिश रिॲलिटी टीव्ही शो 'बिग ब्रदर'च्या महत्त्वाबद्दल सांगितले. या शोने तिला स्वतंत्र कसे केले हेही तिने सांगितले. 90 च्या दशकात शिल्पाचे अनेक चित्रपट हिट झाले असले तरी तिला कधीच टॉप अभिनेत्रीचा दर्जा मिळाला नाही. मात्र, २००७ मध्ये ती ब्रिटिश रिॲलिटी टीव्ही शो 'बिग ब्रदर'ची विजेती बनल्यानंतर तिच्या आयुष्यात मोठा बदल झाला. सिद्धार्थ काननला दिलेल्या मुलाखतीत शिल्पा म्हणाली, 'या शोने मला चित्रपटांपेक्षा जास्त लोकप्रियता दिली. मला विश्वास आहे की इथेच माझ्या कारकिर्दीला काव्यात्मक न्याय मिळाला. असे अनेक कलाकार आहेत ज्यांना चित्रपटातूनही लोकप्रियता मिळाली नाही, जी मला या शोमधून मिळाली. हा माझ्यासाठी आयुष्य बदलणारा शो होता. मुलाखतीत अभिनेत्रीने असेही सांगितले की, या शोनंतर ती आयुष्यात स्वतंत्र व्हायला शिकली, नाहीतर याआधी तिची आई नेहमीच तिच्यासोबत राहायची. शिल्पा म्हणाली, 'माझ्यासाठी हे खूप कठीण होते कारण तोपर्यंत मी खूप संरक्षित होते. माझी आई अनेकदा माझ्या आउटडोअर शूटवर माझ्यासोबत असायची. माझ्या वडिलांनी ही अट घातली होती. बिग ब्रदरनंतरच मी स्वतंत्र व्हायला शिकले. 22 सप्टेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणाऱ्या 'सुखी'ची कथा एका गृहिणीच्या जीवनावर आधारित आहे जी आपल्या कुटुंबाला न सांगता शाळेच्या गेट टुगेदरसाठी दिल्लीला निघते. सोनल जोशी दिग्दर्शित हा चित्रपट महिला सक्षमीकरणावर हलक्याफुलक्या पद्धतीने भाष्य करतो. यात अमित साध, कुशा कपिला आणि पावलीन गुलाटी हे कलाकार दिसणार आहेत.



# 'द ग्रेट इंडियन फॅमिली'चा ट्रेलर रिलीज

विकी कौशल आणि मानुषी छिल्लर स्टारर 'द ग्रेट इंडियन फॅमिली' या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. निर्मात्यांनी मंगळवारी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर चित्रपटाचा ट्रेलर रिलीज केला. नावाप्रमाणेच विकी कौशलचा हा चित्रपट कौटुंबिक मनोरंजन करणारा असणार आहे. ट्रेलरची सुरुवात विकी कौशलच्या एंट्रीने होते, ज्यामध्ये तो सांगतो की ही कथा बलरामपूर



नावाच्या शहराची आहे. शहरातील लोक त्याला भजन आणि कीर्तन गाण्यासाठी ओळखतात. त्याचे खरे नाव वेद व्यास त्रिपाठी असून लोक त्याला भजन कुमार म्हणून ओळखतात. तो पंडितांच्या घराण्यातील आहेत आणि त्याच्या कुटुंबात पूजा, भजन आणि कीर्तन करण्याची परंपरा नेहमीच राहिली आहे. शहरातील लोक त्याला भजन-कीर्तनाचा स्टार मानतात. भजन कुमार सांगतो की, तो या व्यवसायात असण्याचे कारण म्हणजे महिला आणि मुली त्याच्या पायांना स्पर्श करतात. त्या नेहमी त्याच्याकडे पुजारी किंवा उपासकाच्या दृष्टीकोनातून पाहतात. त्याच्या आयुष्यात एकही मुलगी येत नाही. स्टारकास्टबद्दल बोलायचे झाले तर विकी कौशल व्यतिरिक्त मानुषी छिल्लर, कुमुद मिश्रा, यशपाल शर्मा, मनोज पाहवा, सादिया सिद्दीकी, अलका अमीन यांच्यासह अनेक कलाकार या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत. हा चित्रपट 22 सप्टेंबरला थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# टीम इंडियाने केले लंका दहन!

## » रोमहर्षक विजय मिळवत थेट फायनलमध्ये मारली धडक

नवी दिल्ली । 
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारत आणि श्रीलंका आशिया चषकातील तिसऱ्या सुपर-४ सामन्यात टीम इंडियाने ४१ धावांनी रोमहर्षक विजय नोंदवला. सलग १३ वन डे नंतर श्रीलंकेचा विजयरथ रोखत त्यांचा पराभव केला. या विजयासह भारतीय संघ आशिया चषक २०२३च्या फायनलमध्ये पोहचला आहे. टीम इंडियाच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत श्रीलंकेला १७२ धावांवर सर्वबाद केले.**




कुलदीप यादवने या सामन्यात अफलातून कामगिरी केली. फलंदाजीत कर्णधार रोहित शर्माने शानदार अर्धशतक झळकावले. दुनिथ वेलालगेने भारतीय संघाने गोलंदाजी आणि फलंदाजीत झुंजवले, त्याला सामनावीराचा पुरस्कार दिला. भारताने श्रीलंकेचा ४१ धावांनी पराभव केला आहे. यासह टीम इंडियाने आशिया कप २०२३च्या फायनलमध्ये प्रवेश केला आहे. प्रथम फलंदाजी करताना भारताने ४९.१ षटकात २१३ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ ४१.३ षटकांत १७२ धावांवर गारद झाला. भारताकडून कर्णधार रोहित शर्माने सर्वाधिक ५३ धावा केल्या. राहुलने ३९ आणि किशनने ३३ धावांचे योगदान दिले. श्रीलंकेकडून दुनिथ वेलालगेने पाच आणि चरिथ असलंकाने चार विकेट्स घेतल्या. श्रीलंकेच्या डावात ड्युनिथ वेलालगेने सर्वाधिक ४२* धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादवने चार विकेट घेतल्या. जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजाने प्रत्येकी दोन बळी घेतले. भारतीय कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. खेळपट्टी पाहता शार्दुल ठाकूरच्या जागी टीम इंडियाने अक्षर पटेलला संधी दिली.

रोहित आणि गिलच्या जोडीने पुन्हा एकदा दमदार सुरुवात केली. दोघांनी मिळून पॉवरप्लेमध्ये ६५ धावा जोडल्या. रोहित आणि गिल यांच्यात ११.१ षटकात पहिल्या विकेटसाठी ८० धावांची भागीदारी केली . पुढच्याच षटकात त्याने विराट कोहलीलाही तीन धावांवर बाद केले आणि आपल्या तिसऱ्या षटकात वेलल्गेनेही रोहितला बोल्ड केले आणि टीम इंडिया अडचणीत आली. बाद होण्यापूर्वी रोहितने ४८ चेंडूत सात चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ५३ धावा केल्या. आशिया चषक स्पर्धेत त्याने सलग तिसऱ्या डावात अर्धशतक झळकावले आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये १०,००० धावाही पूर्ण केल्या. हे त्याचे वन डेतील ५१वे अर्धशतक होते. भारताच्या ९१ धावांवर तीन विकेट्स पडल्यानंतर इशान किशन आणि लोकेश राहुलने डावाची धुरा सांभाळली. दोघांमध्ये अर्धशतकी भागीदारी झाली आणि टीम इंडियाची धावसंख्या १५० धावांच्या पुढे गेली. ३९ धावांवर लोकेश राहुलला बाद करत वेललगेने भारताला चौथा धक्का दिला. पुढचे षटक वेलल्गेच्या स्पेलचे शेवटचे षटक होते आणि त्याने शेवटच्या चेंडूवर ५ धावांवर हार्दिक पांड्याला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. वेललागेने प्रथमच एकदिवसीय सामन्यात पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला. रवींद्र जडेजाही १९ चेंडूत ४ धावा काढून असलंकाचा बळी ठरला. त्यानंतर पाच धावांवर असलंकाने बुमराहला बोल्ड केले. पुढच्याच चेंडूवर कुलदीपही खाते न उघडताच बाद झाला. भारताने १८६ धावांत नऊ विकेट्स गमावल्या होत्या. अशा स्थितीत सिराज आणि अक्षर यांनी शेवटच्या विकेटसाठी २७ धावांची भागीदारी केली आणि भारताची धावसंख्या २१३ धावांपर्यंत नेली. मात्र, टीम इंडियाला या स्पर्धेत दुसऱ्यांदा पूर्ण ५० षटकेही खेळता आली नाहीत आणि ४९.१ षटकांत २१३ धावा केल्या.

### कुलदीपची अफलातून कामगिरी

» कुलदीप यादवने या सामन्यात अफलातून कामगिरी केली. फलंदाजीत कर्णधार रोहित शर्माने शानदार अर्धशतक झळकावले. दुनिथ वेलालगेने भारतीय संघाने गोलंदाजी आणि फलंदाजीत झुंजवले, त्याला सामनावीराचा पुरस्कार दिला. भारताने श्रीलंकेचा ४१ धावांनी पराभव केला आहे. यासह टीम इंडियाने आशिया कप २०२३च्या फायनलमध्ये प्रवेश केला आहे. प्रथम फलंदाजी करताना भारताने ४९.१ षटकात २१३ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ ४१.३ षटकांत १७२ धावांवर गारद झाला. भारताकडून कर्णधार रोहित शर्माने सर्वाधिक ५३ धावा केल्या. राहुलने ३९ आणि किशनने ३३ धावांचे योगदान दिले.

# गौतम गंभीरने केले धोनीचे तोंडभरून कौतुक!

## » आज रोहित शर्मा जो काही आहे तो धोनीमुळेच आहे : गंभीर

नवी दिल्ली । 
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया चषकाच्या सुपर-४ फेरीत भारतीय संघाने आपल्या दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेचा ४१ धावांनी पराभव केला. यासह टीम इंडियाने अंतिम फेरी गाठली आहे. आता भारताचा सामना श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यातील विजेत्याशी होणार आहे. मात्र, याआधी टीम इंडियाला बांगलादेशविरुद्ध सामना खेळायचा आहे.**

या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत २१३ धावा केल्या आणि प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ १७२ धावांवर गारद झाला. गौतम गंभीरने एम.एस. धोनीचे कौतुक केले आणि रोहित शर्माबाबत मोठे विधानही केले. माजी सलामीवीर गंभीर म्हणाला, “माझ्या मते, या विजयामुळे भारतीय संघाला जास्त आत्मविश्वास मिळाला असेल.” स्टार स्पोर्ट्सशी बोलताना गंभीर पुढे म्हणाला, “हा विजय माझ्यासाठी पाकिस्तानपेक्षाही मोठा होता. आपण पाकिस्तानविरुद्ध २२८ धावांनी दणदणीत विजय मिळवला होता. मात्र, या विजयामुळे संघाचा आत्मविश्वास जास्त वाढला असेल. फलंदाजीबाबत संशय नव्हता कारण, खेळपट्टी तशीच होती. जसप्रीत बुमराह दुखापतीतून पुनरागमन करत होता. त्यामुळे त्याच्याविषयी थोडी मनात शंका होती. यानंतर कुलदीप यादव आणि बाकीचे सर्व गोलंदाज यांनी शानदार कामगिरी केली. या खेळपट्टीवर परिस्थिती पाहता २१३ धावसंख्येचा बचाव करणे नक्कीच कौतुकास्पद बाब आहे.



भारतीय संघाचा कर्णधार आणि सलामीवीर रोहित शर्माने आशिया चषकाच्या सुपर-४ फेरीच्या सामन्यात श्रीलंकेविरुद्ध ४८ चेंडूत ५३ धावांची शानदार खेळी खेळली आणि यादरम्यान त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये १०,००० धावांचा टप्पाही पार केला. ही कामगिरी करणारा रोहित हा भारताचा सहावा आणि एकूण १५वा फलंदाज ठरला. मात्र, रोहित शर्माच्या कारकिर्दीची सुरुवात अत्यंत संथ आणि संघर्षाने भरलेली होती. रोहित शर्मा हा २००० एकदिवसीय धावा पूर्ण करणारा चौथा सर्वात संथ भारतीय होता आणि त्यावेळी हा खेळाडू १०,००० धावा करेल आणि १०,००० वन डे धावा करणारा तो जगातील दुसरा सर्वात वेगवान भारतीय बनेल असे कोणालाही वाटले नव्हते. रोहितच्या कारकिर्दीत बदल झाला, जेव्हा एम.एस. धोनीने २०१३च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सलामीला फलंदाजी करण्यास पाठिंबा दिला.

### रोहित शर्माचे नशीब बदलले

» धोनीच्या या निर्णयाने रोहित शर्माचे नशीब बदलले आणि आज तो ज्या स्थानावर आहे ते त्याच्यामुळेच, हे कोणापासूनही लपलेले नाही. भारताचा माजी फलंदाज गौतम गंभीरने पुन्हा एकदा मान्य केले आहे की, “आज रोहित शर्मा जो काही आहे तो धोनीमुळेच आहे,” असे गंभीरने म्हटले आहे. भारत-श्रीलंका सामन्यापूर्वी स्टार स्पोर्ट्सशी बोलताना गौतम गंभीर म्हणाला, “रोहित शर्मा एम.एस. धोनीमुळे आज एवढा मोठा टप्पा गाठू शकला. सुरुवातीला त्याच्या संघर्षाच्या एम.एस.ने त्याची साथ दिली.” असे म्हणत गंभीरने धोनी आणि रोहितचे तोंडभरून कौतुक केले.